झाले.

**१) संभाजीचे पूर्वचरित्र (जन्म व बालपण) :-** १४ मे १६५७ रोजी संभाजीचा जन्म पुरंदरच्या किल्ल्यात झाला. सईबाई हे त्याच्या आईचे नाव. शिवाजी महाराजांची ती ज्येष्ठ राणी होती. संभाजी महाराजांच्या जन्मानंतर मातोश्री सईबाईची प्रकृती बिघडत गेली. ५ सप्टेंबर १६५९ रोजी तिचे निधन झाले. संभाजीस मातृसुख मिळाले नाही; पण त्याची उणीव त्यांची आजी जिजाबाईने भरून काढली होती. जिजाबाईने १२-१३ वर्षांपर्यंत संभाजीचा सांभाळ करून त्यास मातृप्रेम दिले. १७ जून १६७४ ला जिजाबाई मृत्यू पावली. त्यामुळे संभाजी एका अर्थाने पोरकाच झाला.

**२) राजकीय प्रशिक्षण :-** संभाजीच्या शिक्षणाची चोख व्यवस्था करण्यात आली होती. शिवाजीने संभाजीला शिकवण्यासाठी केशवभट्ट व उमाजी पंडित यांना नेमले होते. 'बुधभूषणम' या संस्कृत ग्रंथावरून संभाजीने काव्यालंकार, शास्त्रे, पुराणे, संगीत व धनुर्विद्या यांचा सखोल अभ्यास केला होता असे दिसते. घोड्यावर बसणे, तालीम तलवार, व भाला इ. चे शिक्षण मिळाले होते. ९ वर्षांचा असताना तो पित्यासोबत आग्र्यास गेला होता. आग्र्याहून सुटल्यानंतर शिवाजी मथुरेस गेले. तेथे पेशवा मोरोपंत पिंगळे यांचे मेहुणे राहत होते. रस्त्यात प्रवासाची दगदग सहन होणार नाही म्हणून बाल संभाजीला शिवाजीने त्यांच्याकडे ठेवले. नंतर संभाजीस रायगडावर आणून सोडण्यात आले.

**३) संभाजी औरंगजेबचा मनसबदार :-** राजकारणातील मुत्सद्देगिरी, डावपेच, तह बोलणी इ. गोष्टी संभाजीला लहानपणी जवळून पाहता आल्या. पुरंदरच्या तहाच्या वेळी शिवाजी महाराजांनी संभाजीस सोबत नेले होते. पुरंदरच्या तहानुसार ८ व्या वर्षीच संभाजी मोगलांचे पंचहजारी मनसबदार बनले होते. आग्रा भेटीत व तेथील नजरकैदेच्या काळातही संभाजीस अनेक अनुभव आले. मोगल दरबाराचे बारकाईने निरीक्षण करता आले.

**४) प्रशासनातील सहभाग :-** २६ जानेवारी १६७१ रोजी संभाजीला राज्याचा मुलकी कारभार पाहण्याचा हुकूम शिवाजीने दिला होता. तसेच रायगडावरील स्वतंत्र लष्कराची व्यवस्थापण संभाजीवर १४ व्या वर्षीच टाकण्यात आली होती. इ. स. १६७२ मध्ये फ्रेंच व्यापारी अॅबे कॅरे हा रायगडावर आला होता. त्याच्या प्रवासवर्णनातील नोंदीनुसार संभाजी हा युवराज हा अत्यंत धैर्यशील व पित्याच्या कीर्तीला साजेसा शूर,

Scanned with OKEN Scanner

संकट कोसळू पाहत असता अण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी इ. शिवाजी महाराजांच्या काळच्या कसलेल्या मुत्सद्द्यांनी अकबराची मदत घेऊन संभाजीला गादीवरून काढून टाकण्याचे कारस्थान करावे, ही अत्यंत दुर्दैवी घटना होय. हे कृत्य राष्ट्रद्रोहीच म्हटले पाहिजे. हे कारस्थान यशस्वी झाले असते तर हिंदवी स्वराज्याचा ग्रंथच आटोपला असता."

**संभाजी-मोगल संबंध :-** औरंगजेबाचा एक पुत्र अकबर हा त्याचा सर्वात आवडता होता. त्याचे एक कारण अकबराची आई लहानपणीच वारली होती व दुसरे म्हणजे अकबराने लहानपणापासून कर्तबगारी दाखविण्यास प्रारंभ केला होता. औरंगजेबाने अकबरावर काही जबाबदाऱ्या टाकल्या होत्या. राजस्थानातील राठोडांच्या बंडाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविली होती. राठोडांचा बंदोबस्त कसा करावयाचा याबद्दल सूचना औरंगजेबने अकबरास दिल्या होत्या परंतु त्याचा उपयोग झाला नाही. सर्व राजपूत राजांनी औरंगजेबविरुद्ध एकजुट केली व मोगलांविरुद्ध युद्ध चालू ठेवले. अकबर एक वर्ष राजपुतांशी लढत होता; पण यश मिळण्याची शक्यता नव्हती. तेव्हा राजपुतांशी मैत्री करून युद्ध संपुष्टात आणण्याचा सल्ला अकबराने औरंगजेबास दिला होता. राजपूतपण युद्धामुळे त्रस्त झाले होते व युद्ध करण्याच्या मन:स्थितीत नव्हते हे अकबर जाणून होता. पण औरंगजेब हा धर्मवेडा असल्याने तो राजपुतांशी सुरू असलेले युद्ध थांबविण्याच्या मन:स्थितीत नव्हता. अकबराने राजपुताबाबत अत्यंत सौम्य धोरण आखले म्हणून औरंगजेबाने त्याच्यावर टीका केली. शेवटी अकबराने वडील औरंगजेबाविरुद्ध बंड पुकारले.

अकबराने राजपुतांच्या साहाय्याने स्वत:ला बादशहा म्हणून जाहीर करून औरंगजेबशी शत्रुत्व स्वीकारले (१ जानेवारी १६८१). पण औरंगजेबाच्या कपटनीतीपुढे त्यास हार खावी लागली व आपला जीव वाचविण्यासाठी मारवाडचा दिवाण दुर्गादास राठोड याच्यासह दक्षिणेस संभाजीच्या आश्रयास यावे लागले. अकबराने संभाजीस मदत करण्यासाठी विनवणी करणारी दोन पत्रे लिहिली. या पत्रापाठोपाठ अकबराने खानदेश, बागलाण, नाशिक, त्र्यंबकेश्वर या मार्गाने कोकणात प्रवेश केला. १ जून १६८१ ला अकबर रायगडाच्या उत्तरेस २५ मैलांवरील पाली येथे पोहोचला. पण पावसाळा सुरू झाल्याने पाली येथेच अकबरास राहावे लागले. या काळात संभाजीने नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद या दोन मराठा सरदारांना अकबराकडे पाठवून

Scanned with OKEN Scanner

यासही त्या कामी अपयश आले. शेवटी हा वेढा मोगलांना उठवावा लागला. रामसेजच्या घाटातून परतणाऱ्या मोगलांच्या फौजेचे वर्णन मनुची पुढीलप्रमाणे करतो, ''मोगल सैन्यात रोगाची इतकी लागण झाली होती की सात दिवसांत या रोगाने पछाडलेला प्रत्येक माणूस गेला. अशा रीतीने १/३ माणसे मृत्युमुखी पडली. हा रोग माणसांनाच झाला असे नाही; जनावरांनाही झाला. घोडी मोठ्या संख्येने मेली. अनेकांना पायी चालण्याची वेळ आली. उन्हामुळे व पाण्यामुळे लोक मेले. ३०,४० हजार मोगल सैनिकांना हा किल्ला लढवण्यात अपयश आले. ही घटना संभाजीशी मराठे मावळे किती एकनिष्ठ होते याचे एक ज्वलंत उदाहरण होय.

३) शहजादा मुअज्जमची कोकण स्वारी (१६८२-८३) :- औरंगजेबाने कोकण जिंकण्यासाठी राजपुत्र मुअज्जम व शहाबुद्दीन यांना पाठविले. तत्पूर्वीच हसनअलीखानने जानेवारी १६८२ मध्ये कल्याण जिंकले. पण त्याची पाठ फिरताच मराठ्यांनी पुन्हा कल्याण जिंकले. नोव्हेंबर १६८२ मध्ये पुन्हा मोगलांनी कल्याण जिंकले. परंतु त्यांची पाठ फिरताच रूपाजी भोसले यांनी मोगलांचा पुन्हा पराभव केला. शेवटी बादशाहाने (औरंगजेब) शहजादा मुअज्जमची कोकणात रवानगी केली. संभाजी यावेळी पोर्तुगीजांशी लढण्यात गुंतला होता. पण त्याने ती मोहीम अर्धवट सोडून मोगलांच्या या आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे ठरविले. मोगलांच्या सैन्याला अन्न व घोड्यांना दाणावैरण मिळूच द्यावयाची नाही असा प्रयत्न मराठी फौजेने केला. परिणामी शेकडो सैनिक व घोडे मृत्यू पावले. मुअज्जमने २-३ महिन्यांत कोकणातील मुक्कामात मालवण, वेंगुर्ले, कुडाळ गावे उद्ध्वस्त करण्याव्यतिरिक्त काहीच केले नाही. धान्यटंचाईमुळे त्रस्त होऊन त्यास परत जावे लागले.

औरंगजेबचा दुसरा मुलगा आझम हा कोल्हापूर भागात मोहिमेवर होता, पण फेब्रुवारी १६८३ मध्ये हंबीरराव मोहिते यांनी त्याचा पराभव केला.

१६८१-८५ पर्यंत चाललेले मोगलांचे आक्रमण मोडून काढण्यात संभाजीला यश आले. म्हणून मराठ्यांविरुद्ध लढण्यात शक्ती खर्च करण्यापेक्षा विजापूर व गोवळकोंडा जिंकण्याचे औरंगजेबाने ठरविले.

४) विजापूर जिंकले - आदिलशाहीचा अस्त - (१६८६) :- विजापूर व गोवळकोंड्याचे मुस्लिम शासक संभाजीला गुप्तपणे मदत करीत होते. या दोन्ही राज्यांनी संभाजीविरुद्ध आपणास मदत करावी अशी औरंगजेबाची इच्छा होती. पण

Scanned with OKEN Scanner

त्यास प्रतिसाद न मिळाल्याने ही दोन्ही राज्ये नष्ट करण्याचे त्याने ठरविले. १६८५ मध्ये राजपुत्र आज्जमला विजापूरवर आक्रमण करण्यासाठी पाठविले. त्याच्यासोबत बहादुरखान व रुहल्लाखान पण होते. त्यांनी विजापूरला वेढा दिला. ही मोहीम यशस्वी व्हावी म्हणून स्वत: औरंगजेब विजापूरवर चालून गेला. संभाजीने आदिलशहास मदत केली. गोवळकोंड्याच्या शासकाकडूनही विजापूरकरांना मदत मिळत होती. परंतु मोगलांच्या प्रचंड सामर्थ्यापुढे खिळखिळ्या झालेल्या आदिलशाहीचा टिकाव लागणे अशक्य होते. १२ सप्टेंबर १६८६ ला विजापूर मोगलांनी जिंकले. ते राज्य खालसा करून मोगलांनी तेथे रुहुल्लाखानची सुभेदार म्हणून नेमणूक केली. आदिलशहाच्या सरदारांनीच आदिलशहाला औरंगजेबाच्या स्वाधीन केले हे दुर्दैव होय.

५) **गोवळकोंडा जिंकले - कुतुबशाहीचा अस्त (१६८७) :-** गोवळकोंड्याचा शासक अब्दुल हसन हा मोगलांच्याविरुद्ध विजापूरकरांना मदत करतो म्हणून औरंगजेबने त्याच्याविरुद्ध मोहीम उघडली. औरंगजेबाने २२ सप्टेंबर १६८७ ला गोवळकोंड्याचा किल्ला जिंकला. अवर्षण व प्लेगची साथ यात मोगल सैन्याचे प्रचंड नुकसान झाले. गोवळकोंडा मोगलांच्या ताब्यात जाऊ नये असा संभाजीचा प्रयत्न होता. पण त्यास यश आले नाही. दक्षिणेतील हे दुसरे राज्य औरंगजेबाच्या ताब्यात गेले. या दोन्ही शाह्या अंतर्गत हेवेदावे, अननुभवी शासक, स्वार्थी सरदारमंडळी यामुळे पोखरून गेल्या होत्या.

६) **मोगल-मराठा संघर्ष स्वराज्यावर मोगलांची धाड : (१६८७-८९) :-** आदिलशाही व कुतुबशाही नष्ट झाल्यानंतर औरंगजेबाने आपले लक्ष मराठ्यांवर केंद्रित केले. स्वराज्याची चारही बाजूंनी कोंडी करण्याचा त्याचा प्रयत्न होता. मातबरखान यास नाशिक भागात, राजपुत्र आझमला बेळगाव भागात, शेख निजामला कोल्हापूर भागात त्याने पाठवले. कर्नाटकात जो प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात होता त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संभाजीने स्वत:चे मेव्हणे हरिजी महाडीक यांना कर्नाटकचा सुभेदार म्हणून नियुक्त केले. त्यांच्या मदतीला संताजी घोरपडे होते. पण मराठा सरदारांत ऐक्य नसल्यामुळे मोगलांना थोपविणे त्यांना अशक्य झाले. नाशिक -बागलाण आणि कोल्हापूर भागातील काही प्रदेश व किल्ले मोगलांच्या हाती आले. परंतु रायगड जिंकणे मोगलांना जमले नाही. कोकण व सह्याद्री प्रदेशातही मोगलांना यश आले नाही.

७) **अकबराची निराशा व शेवट :-** मराठ्यांच्या मदतीने उत्तरेकडे स्वारी करावी,

Scanned with OKEN Scanner

मोगलांच्या अफाट शक्तिसामर्थ्याच्या आघातापासून संभाजी राजांनी आपले 'हिंदवी स्वराज्य' ८-९ वर्षे सुरक्षित राखले. अशा दुर्धरसमयी संभाजी राजे बेफिकीर किंवा अकार्यक्षम राहिले असते तर हिंदवी स्वराज्य सुरक्षित राहिले नसते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत लष्करासह येत आहे ही वार्ता मिळताच संभाजी राजांनी मोगलांच्या दक्षिणेतील राजधानी (बऱ्हाणपूर) वर हल्ला करून प्रचंड लूट करून ती उद्ध्वस्त केली. रोगराई, प्रचंड पाऊस, कडक उन्हाळा, अपुरी रसद इ. मुळे शेवटी औरंगजेबाने बरेचसे लष्कर परत पाठविले होते.

अकबराचा संभाजीला कितपत फायदा करून घेता आला याबद्दल मराठा इतिहासकारांत बरीच मतभिन्नता आढळते. **रियासतकार सरदेसाई** यांच्या मते, "But such a daring project required a genious like that of Shivaji to execute it. Sambhaji brave as a lion personally lacked the patient calculating fore-thought and vigilance essential for the success of such an extensive and large scale unertaking." उलट श्री. वा. सी. बेन्द्रे यांच्या मताप्रमाणे, "शहाजादा अकबर याचा मोगली परचक्रास शह देण्यात संभाजीने पुरेपूर उपयोग करून घेतला." डॉ. सौ. कमल गोखले याबाबत लिहितात, "त्याच्याशी वागताना महाराष्ट्राच्या राजाने कुठे नमते घेतले नाही की त्याच्यापुढे मान तुकविली नाही. त्याला कधीही अनावश्यक महत्त्व दिले नाही. मात्र शक्य असेल तेव्हा त्याचा उपयोग करून घेतला."

दक्षिणेतील विजापूरकर, गोवळकोंडेकर व कर्नाटकातील सत्ताधीश नायक यांची एकजूट करण्याचा अयशस्वी प्रयत्न संभाजी महाराजांनी केला. म्हणून, Dr. K. N. Chitnis म्हणतात, "If Sambhaji had more time he would certainly have succeeded in large measure in fulfilling his vision of united and strong south to serve as a bulwork against the Mughal onslougths from the North."

**संभाजी-पोर्तुगीज संबंध :** शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीने बाह्य शत्रूंशी मैत्री करण्याचे ठरविले होते. त्याचा एक भाग म्हणून मे १६८० मध्ये रामोजी ठाकूर नावाच्या आपल्या वकिलास पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी पाठविले. पण रामोजी ठाकूर हा सोयराबाईच्या पक्षातील होता. त्याने जी प्रमाणपत्रे सोबत नेली होती ती पोर्तुगीजांना विश्वासार्ह न वाटल्याने प्रत्यक्ष करार झाला नाही. गोव्यातील डिचोलीच्या मराठा सुभेदार मोरो दादाजी याच्याविरुद्ध पोर्तुगीजांनी संभाजीकडे तक्रारी केल्या तेव्हा त्याची चौकशी करून त्याच्या जागी जिवाजी विनायक यास संभाजीने

Scanned with OKEN Scanner

डिचोलीचा गव्हर्नर म्हणून नेमले.

१) आंजेदीव बेट पोर्तुगीजांनी व्यापले :- गोवा किनारपट्टीत कारवाजवळ आंजेदीव हे बेट होते. आरमाराच्या दृष्टीने हे बेट संभाजीला महत्त्वाचे होते म्हणून त्याने या बेटावर तटबंदी करून तेथे किल्ला बांधण्याचे ठरविले. आंजेदीव बेटावर संभाजीने किल्ला बांधला तर पोर्तुगीजांच्या सागरी वाहतुकीस त्यामुळे धोका निर्माण होईल, अशी भीती पोर्तुगीजांना वाटू लागली. त्यामुळे पोर्तुगीजांनी आंजेदीव बेट ताब्यात घेतले व तेथे किल्ला बांधला. त्यासंदर्भात पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी खुलासा केला की, "आमच्या अधिकाराच्या कक्षेत वाटेल ते करू. त्याचा हिशेब देण्याचे आमच्यावर बंधन नाही."

२) पोर्तुगीजांची मोगलांशी मैत्री :- मार्च १६८२ मध्ये औरंगजेब दक्षिणेत आला तेव्हा त्याने शेख महंमद नावाचा आपला वकील गोव्याच्या व्हाइसरॉयकडे पाठवला व त्यांची मदत मराठ्यांविरुद्ध मागितली. तेव्हा पोर्तुगीजांनी औरंगजेबास खालील मदत देण्याचे मान्य केले.

१. मोगल आरमाराला आमच्या मुलुखातून जाताना आरमाराकडून कोणताच प्रतिबंध होणार नाही.

२. मोगल सैन्याला आमच्या राज्यात जीवनोपयोगी वस्तू विकत घेता येतील.

३. संभाजीचा पराभव झाल्यानंतर दक्षिण कोकणचा भाग पोर्तुगीजांना दिला जाईल.

या करारामुळे पोर्तुगीज-मराठे संबंध बिघडले.

३) संभाजीचे पोर्तुगीज प्रदेशावर हल्ले :- प्रस्तुत मैत्री करारामुळे संभाजी महाराज नाराज झाले व त्यांनी पोर्तुगीज प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. संभाजीने ठाणे जिल्ह्यातील डहाणू, असेरी, तारापूर या तीन ठाण्यावर हल्ले चढवले. तारापूरचे ठाणे पोर्तुगीजांनी ८ दिवस लढवले. मराठ्यांनी अनेक खेड्यांची जाळपोळ केली व अनेक नौका हस्तगत केल्या. याचा बदला म्हणून पोर्तुगीजांनी येसाजी गंभीर याला नजरकैदेत ठेवले.

४) मराठ्यांचा चौल बंदरावर हल्ला :- जुलै १६८३ मध्ये मराठे-पोर्तुगीज संबंध बिघडल्याने परस्परांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न दोघेही करू लागले. ऑगस्ट १६८३ मध्ये संभाजी नारवे या गावी गोकूळअष्टमीला यात्रेसाठी येणार होता. तेव्हा त्यास पकडण्याचा पोर्तुगीज व्हाइसरॉयने कट केला होता; पण संभाजी नारवे या गावी न

Scanned with OKEN Scanner

सरदेशमुखीची वतने बहाल केली व त्याच्या मोबदल्यात त्यांनी मराठ्यांवर हल्ले केले व त्यांची ठाणी व किल्ले जिंकून मोगलांच्या स्वाधीन केले. संभाजीनेही पोर्तुगीजांवरील हल्ले चालूच ठेवले.

संभाजी वधानंतर पोर्तुगीज व मराठे यांच्यातील युद्ध जवळजवळ संपुष्टात आले. परंतु संभाजी जिवंत असता पोर्तुगीजांना त्याचा एवढा वचक वाटत होता की, त्याला ते सार्वभौम राजा म्हणून मानत होते. संभाजीच्या वकिलास ते सार्वभौम राजाच्या वकिलाप्रमाणे वागवीत असत. संभाजीच्या नावामागे 'छत्रपती' हे अभिधान ते लावत. संभाजी आणखी काही वर्षे जगला असता तर पोर्तुगीजांना ठाणे जिल्ह्यातून आणि गोव्यातून हाकलून लावण्यात यशस्वी झाला असता.

**संभाजी व सिद्दी संबंध :-** पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी ही एक प्रचंड शक्ती होती. शिवाजी महाराजांनी सिद्दीचा बंदोबस्त करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. कृ.अ. सभासद यांनी 'घरात जैसा उंदीर तैसा महाराजांच्या राज्यास सिद्दी' असे त्याचे वर्णन केले आहे. पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीज, डच, फ्रेंच, मराठे इ. आरमारी सत्तांप्रमाणेच सिद्दीची सत्ता होती. त्यांच्या राज्यात जंजिरा, मुरूड, नांदगाव, मांडले, श्रीवर्धन, म्हसले, गोवले, पंचायतन असे महाल होते. त्याचे एकूण क्षेत्रफळ ३२५ चौरस मैल होते. सिद्दी हे मोगलांचे नाविक दल प्रमुख होते. मोगलांच्या लष्करी सामर्थ्याच्या दबावामुळे पोर्तुगीजही मोगलांना मदत करत होते. त्यामुळे सिद्दी व पोर्तुगीज या दोन्ही शक्तीचा बंदोबस्त संभाजीला करावा लागला. औरंगजेबाच्याच प्रोत्साहनामुळे सिद्दीने संभाजीविरुद्ध कुरापती सुरू केल्या. मुंबईकर इंग्रजांशी शिवाजीने जो तह केला त्यात इंग्रजांना मुंबई बंदरात सिद्दीला थारा देऊ नये असे एक कलम आहे.

संभाजी व सिद्दी यांच्यात प्रामुख्याने खालील संघर्ष झाले.

१) संभाजीचा उंदेरी बेटावरील हल्ला (सप्टेंबर १६८०) :- उंदेरी बेटावर राहून सिद्दी मराठी मुलुखात लुटालूट करी म्हणून संभाजीने उंदेरी बेट जिंकण्याचे ठरविले. त्यासाठी २२ गलबते व ३००० नौदल नागेठाण्यास सज्ज ठेवण्यात आले होते. १८ जुलै १६८० रोजी मराठ्यांनी सिद्दीच्या उंदेरी बेटावर हल्ला केला. पण मराठ्यांना अपयश आले. कारण सिद्दींना इंग्रजांकडून मदत होत असे. सुरुवातीस सप्टेंबर १६८० मध्ये स्वतः संभाजीने २०० सैनिकांसह उंदेरी बेटावर हल्ला चढविला; पण त्यात त्याला यश

Scanned with OKEN Scanner

आले नाही.

२) दंडराजपुरीस संभाजीचा वेढा :- जंजिरा हे सिद्दीचे शक्तिस्थान होते. त्यामुळे जंजिरा (दंडराजपुरी) जिंकला तर सिद्दी शरण येईल असे संभाजीला वाटत होते. डिसेंबर १६८१ मध्ये सिद्दीने मराठ्यांच्या राज्यातील नागेठाण, आपटे ही शहरे लुटून जाळली व अनेकांना कैद केले. सिद्दीचा आक्रमकपणा दिवसेंदिवस वाढतच चालला होता. तेव्हा डिसेंबर १६८१ मध्येच संभाजी महाराजांनी अकबरासह २०,००० पेक्षा जास्त सैन्य घेऊन जंजिऱ्यास वेढा दिला. मराठ्यांनी सतत १५ दिवस भडिमार केल्याने कोटाच्या भिंती जमीनदोस्त झाल्या. समुद्रकिनाऱ्यापासून किल्ल्यापर्यंत असलेली खाडी बुजविण्याचा प्रयत्नही संभाजी महाराजांनी करून पाहिला. पण त्यांना यश आले नाही. कारण समुद्र खवळलेला होता. संभाजीने जंजिरा किल्ल्यास दिलेला वेढा चालूच ठेवला.

मराठ्यांचे दुर्दैव की, याच वेळी औरंगजेबाचा सेनापती हसनअली खान याने कल्याण-भिवंडीस वेढा घातल्याची व मराठ्यांच्या सरहद्दीवरच्या किल्ल्याभोवती मोगल लष्कराचे वेढे पडल्याची बातमी आली. त्यामुळे जंजिरा किल्ल्याचा वेढा चालू ठेवण्याची जबाबदारी दादाजी व विसाजी रघुनाथ यांच्याकडे त्यांनी सोपविली व स्वतः संभाजी फेब्रुवारी १६८२ च्या अखेरीस कल्याण प्रांताकडे गेले. पुढे मराठ्यांनी जंजिऱ्याचा वेढा उठविला.

४) सिद्दीकडून संभाजी पराभूत - सिद्दी मिस्त्रीचा मृत्यू :- संभाजीच्या आरमारात दौलतखान कावजी, मोहम्मद, मायनाक भांडारी, सिद्दी संबुळ याचा मुलगा सिद्दी अहमद व त्याचा मामा सिद्दी मिस्त्री इ. अधिकारी होते. ऑगस्ट १६८२ मध्ये सिद्दीने पुन्हा उचल खाल्ली. त्याने मराठ्यांच्या नागोठाण्यावर हल्ला करून अनेकांना कैद केले. संभाजीने दौलतखान कावजी व सिद्दी मिस्त्री या दोघांना आरमार देऊन सिद्दीविरुद्ध पाठवले. कोल गावाजवळ युद्ध होऊन त्याने सिद्दी मिस्त्री मारला गेला. या आरमारी युद्धात मराठे पराभूत झाले.

५) सिद्दी-मराठे संघर्ष - १६८६ :- जंजिऱ्याची सर्व सूत्रे मोगलांनी सिद्दी खैरियतच्या हातात दिली. १६८६ मध्ये त्याने औरंगजेबाच्या चिथावणीवरून मराठ्यांविरुद्ध पुन्हा उचल खाल्ली. त्याने मराठ्यांचे काही प्रदेश व किल्ले पुन्हा जिंकले. जैतपूरच्या खाडीत मराठ्यांनी सिद्दीला चांगलाच धडा शिकवला. संभाजीला सिद्दीच्या विरुद्धची मोहीम अर्धवट ठेवावी लागली. कारण औरंगजेबाने मराठ्यांविरुद्ध चालू ठेवलेली युद्धमोहीम

Scanned with OKEN Scanner

होय.

सिद्दी व संभाजी यांच्यात अनेक युद्धे झाली. पण सिद्दीचा पूर्णपणे बंदोबस्त करण्यात संभाजीस अपयश आले. मोगलांच्या आक्रमणामुळे त्याला सिद्दीवरील मोहीम अर्धवट सोडावी लागली.

**संभाजी - इंग्रज संबंध :-** संभाजी-इंग्रज संबंध हे गुंतागुंतीचे बनले होते. कधी मैत्री, कधी शत्रुत्व, तर कधी तटस्थता असे त्याचे स्वरूप होते. शिवाजी महाराज व इंग्रज यांच्यातील करारानुसार इंग्रजांनी सिद्दीस पाठिंबा देऊ नये असे ठरले होते. पण मुंबईकर इंग्रजांनी त्यास थारा दिला होता. तेव्हा संभाजी महाराजांनी इंग्रजांची खोड मोडण्यासाठी राजापूरच्या वखारीजवळ मराठा सैन्य पाठवून वकील आवजी पंडित याच्यातर्फे इंग्रजांना धमकावले की, इंग्रज सिद्दीस देत असलेली मदत बंद करणार नसतील तर संभाजी महाराज मुंबईवर स्वारी करतील. राजापूरची वखार मराठ्यांनी लुटली त्याच्याही नुकसानभरपाईचा प्रश्न होता. संभाजी महाराजांनी उत्तर कोकणातील मुंबईजवळची काही ठाणी (कोलबा, कारंजा, सोपारा, एलिफंटा) जिंकल्याने मुंबईकर इंग्रजांना मराठ्यांची भीती वाटू लागली. शेवटी १६८४ मध्ये इंग्रज-मराठा यांच्यात मैत्रीचा करार झाला. हा करार अनेक अर्थाने महत्त्वाचा आहे. या करारानुसार खालील गोष्टी ठरल्या.

१. इंग्रजांनी वाटेल तेथे वखारी स्थापन कराव्यात. नागोठाणे व पेण येथेही वखारी काढण्यास परवानगी राहील.

२. इंग्रजांनी मराठा राज्यातील कोणत्याही व्यक्तीला गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यासाठी विकत घेऊ नये.

३. जो माल इंग्रज आयात करतील त्यावर अडीच टक्के जकात देतील व निर्यात करतील त्यावर जकात राहणार नाही.

४. इंग्रज-मराठे यांचे अधिकारी गुन्हा करून एकमेकांच्या हद्दीत पळून आले तर ते पकडून त्यांच्या त्यांच्या ताब्यात एकमेकांनी द्यावेत.

५. पोर्तुगीज-डच-इंग्रज यांच्यात जो लढा चालू आहे त्यापासून मराठे तटस्थ राहतील.

६. इंग्रजांना व त्यांच्या व्यापाऱ्यांना मराठ्यांच्या राज्यात येण्यास परवानगी राहील.

Scanned with OKEN Scanner

मिळू शकली याचे श्रेय मातबरखानास द्यावे लागेल. झुल्फिकारखानने रायगड जिंकून घेतला. त्यामुळे मोगलांना आनंद झाला. पण तो आनंद त्यांना जास्त काळ उपभोगता आला नाही.

**राजारामाचे सेनापती व मुत्सद्द्यांसह रायगडहून पलायन व प्रतापगडावर वास्तव्य :** मोगलांचा रायगडचा वेढा चालू असतानाच ५ एप्रिल १६८९ रोजी छत्रपती राजारामने आपल्या सोबत रामचंद्रपंत आमत्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी प्रल्हाद, बाजी पारसनीस, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, धनाजी जाधव संताजी घोरपडे यांच्यासह पलायन केले होते, कारण किल्ल्यात थांबण्यापेक्षा मोगलांचे लक्ष विचलित करण्यासाठी व स्वराज्यातील जनतेचे संरक्षण करण्यासाठी छत्रपतीनी व प्रमुख सेनानींनी किल्ल्याबाहेर पडावे असे ठरले होते. छत्रपती राजारामने आपली कुटुंबातील मंडळी विशालगड व रांगणा किल्ल्यावर पाठवली होती. छ. राजारामाने सेनापतींसह पलायन केल्याचे समजताच औरंगजेबाला धक्का बसला. छत्रपती राजाराम आपल्या सेनापतींसह प्रतापगड येथे थांबला. स्वराज्यातील बऱ्याच किल्ल्यांना भेटी देऊन किल्ल्यांची डागडुगी केली. राजाराम प्रतापगडावर आहे हे समजताच मोगलांनी प्रतापगडावर आक्रमण केले. एप्रिल १६८९ मध्ये मोगलांनी प्रतापगड जिंकला.

**राजारामाचे जिंजीकडे पलायन (सप्टेंबर १६८९) :-** मोगलांच्या प्रतापगडावरील आक्रमणापूर्वीच राजारामाने पन्हाळा येथे आश्रय घेतला होता. मोगलांच्या फौजांना मराठ्यांविरुद्ध एकामागून एक विजय मिळत होते. तेव्हा छत्रपती राजारामांनी सतत एका किल्ल्याहून दुसऱ्या किल्ल्यावर आश्रयास जाणे धोक्याचे आहे, तसेच छत्रपती राजारामाच्या प्रकृतीलाही ही धावपळ मानवणार नाही, तेव्हा महाराष्ट्रापासून दूर कर्नाटकातील जिंजीच्या किल्ल्यात आश्रयासाठी राजारामास पाठवावे असा विचार तत्कालीन मराठा मुत्सद्द्यांनी केला. तेव्हा सप्टेंबर १६८९ मध्ये छ. राजाराम पन्हाळगडावरून वेषांतर करून निसटले व १५ नोव्हेंबर १६८९ रोजी ते जिंजीस पोहचले. हळूहळू राजारामाचे सर्व मंत्री, सहाय्यक व अनुयायी पण जिंजीस पोहोचले. छ. राजारामाचा पन्हाळा ते जिंजी हा जो प्रवास होता त्याचे वर्णन राजारामाचा उपाध्याय केशव पुरोहित याने लिहिलेल्या 'राजारामचरित' या ग्रंथात आहे. वा. सी. बेंद्रे या इतिहास संशोधकाने 'छत्रपती राजाराम' या ग्रंथात एक स्वतंत्र प्रकरणात या प्रवासाचा आढावा घेतला आहे. छ. राजारामांनी लिंगायत वाण्याचा वेष धारण केला होता.

Scanned with OKEN Scanner

मिळू शकली याचे श्रेय मातबरखानास द्यावे लागेल. [illegible] जिंकून घेतला. त्यामुळे मोगलांना आनंद झाला. पण तो आनंद त्यांना जास्त काळ उपभोगता आला नाही.

**राजारामाचे सेनापती व मुत्सद्द्यांसह रायगडहून पलायन व प्रतापगडावर वास्तव्य** : मोगलांचा रायगडचा वेढा चालू असतानाच ५ एप्रिल १६८९ रोजी छत्रपती राजारामने आपल्या सोबत रामचंद्रपंत आमत्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी प्रल्हाद, बाजी पारसनीस, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, धनाजी जाधव संताजी घोरपडे यांच्यासह पलायन केले होते, कारण किल्ल्यात थांबण्यापेक्षा मोगलांचे लक्ष विचलित करण्यासाठी व स्वराज्यातील जनतेचे संरक्षण करण्यासाठी छत्रपतीनी व प्रमुख सेनानींनी किल्ल्याबाहेर पडावे असे ठरले होते. छत्रपती राजारामने आपली कुटुंबातील मंडळी विशालगड व रांगणा किल्ल्यावर पाठवली होती. छ. राजारामाने सेनापतींसह पलायन केल्याचे समजताच औरंगजेबाला धक्का बसला. छत्रपती राजाराम आपल्या सेनापतींसह प्रतापगड येथे थांबला. स्वराज्यातील बऱ्याच किल्ल्यांना भेटी देऊन किल्ल्यांची डागडुगी केली. राजाराम प्रतापगडावर आहे हे समजताच मोगलांनी प्रतापगडावर आक्रमण केले. एप्रिल १६८९ मध्ये मोगलांनी प्रतापगड जिंकला.

**राजारामाचे जिंजीकडे पलायन (सप्टेंबर १६८९)** :- मोगलांच्या प्रतापगडावरील आक्रमणापूर्वीच राजारामाने पन्हाळा येथे आश्रय घेतला होता. मोगलांच्या फौजांना मराठ्यांविरुद्ध एकामागून एक विजय मिळत होते. तेव्हा छत्रपती राजारामांनी सतत एका किल्ल्याहून दुसऱ्या किल्ल्यावर आश्रयास जाणे धोक्याचे आहे, तसेच छत्रपती राजारामाच्या प्रकृतीलाही ही धावपळ मानवणार नाही, तेव्हा महाराष्ट्रापासून दूर कर्नाटकातील जिंजीच्या किल्ल्यात आश्रयासाठी राजारामास पाठवावे असा विचार तत्कालीन मराठा मुत्सद्द्यांनी केला. तेव्हा सप्टेंबर १६८९ मध्ये छ. राजाराम पन्हाळगडावरून वेषांतर करून निसटले व १५ नोव्हेंबर १६८९ रोजी ते जिंजीस पोहचले. हळूहळू राजारामाचे सर्व मंत्री, सहाय्यक व अनुयायी पण जिंजीस पोहोचले. छ. राजारामाचा पन्हाळा ते जिंजी हा जो प्रवास होता त्याचे वर्णन राजारामाचा उपाध्याय केशव पुरोहित याने लिहिलेल्या 'राजारामचरित' या ग्रंथात आहे. वा. सी. बेंद्रे या इतिहास संशोधकाने 'छत्रपती राजाराम' या ग्रंथात एक स्वतंत्र प्रकरणात या प्रवासाचा आढावा घेतला आहे. छ. राजारामांनी लिंगायत वाण्याचा वेष धारण केला होता.

Scanned with OKEN Scanner

चिटणीस बखरात राजारामासोबत धनाजी जाधव व संताजी घोरपडे पण होते, हा जो उल्लेख आहे तो इतिहाससंशोधक वा. सी. बेंद्रे यांना चुकीचा वाटतो. प्रो. बेंन्द्रे म्हणतात, दोघे स्वराज्यातील व्यवस्थेसाठी रामचंद्रपंतांजवळ होते. केशव पंडितांनी 'राजारामचरित्' मध्ये राजारामांनी पन्हाळा ते जिंजी हा जो ६०० मैलांचा प्रवास केला त्याचे वर्णन दिले आहे. त्याशिवाय मार्टिनच्या रोजनिशीत माआसिर-इ-अलमगिरी या तत्कालीन ग्रंथातही या जिंजीकडील प्रवासाचे वर्णन आहे. या प्रवासात राजारामाबरोबर बहिर्जी घोरपडे, रूपाजी भोसले, संताजी जगताप, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ चिटणीस, नीळकंठ मोरेश्वर पिंगळे, सेनापती पानसंबळ इ. मंडळी होती. मोगल बादशहास छ. राजाराम पन्हाळ्याहून पळूने गेल्याचे समजताच जिंजीस जाणाऱ्या राजारामास पकडण्यासाठी मोगलांनी सगळीकडून नाकेबंदी केली. बेळगावच्या मोगल सरदार बहादुरखानने पोर्तुगीजांना कळविले की, ''राजाराम कर्नाटकात पळून जाणार असल्याची बातमी असल्याने त्याच्या मार्गातील सर्व वाटा पोर्तुगीजांनी रोखून धराव्यात व तो जर सापडला तर त्यास कैद करावे किंवा मारून टाकावे.'' मोगल सुभेदार बहादुरखान याने तुंगभद्रा नदीच्या तीरावर छ. राजारामावर हल्ला केला. बहिर्जी घोरपडे यांनी याप्रसंगी राजारामास अक्षरश: खांद्यावर उचलून सुरक्षित स्थळी पोहोचविले. जिंजीच्या किल्ल्यावर राजाराम २ नोव्हेंबर १६८९ रोजी पोहोचले होते.

**जिंजी येथील राजारामाचे कार्य :-** मराठी राज्यापासून जिंजी ६०० मैल असून राजारामाने तेथून कारभार पाहिला. रायगड मोगलांकडून जिंकून घेण्यासाठी व महाराष्ट्रातील किल्ल्यांची देखरेख करण्यासाठी त्यांनी जिंजीहून आबाजी सोनदेव यास व त्यांना त्यांच्या कामात सहकार्य करावे अशी सूचना रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण सचिव यास दिली. पुरंदरचा किल्ला बेरड या लोकांनी जिंकून दिला तर बेरड लोकांना बक्षिसे द्यावीत, असे त्यांनी सुचविले होते. मराठा लष्करातील सैनिकांनी पंढरपूर, तुळजापूर, तिरुपती इ. ठिकाणच्या यात्रेकरूंना त्रास देऊ नये असे फर्मावले होते; तसेच देवदेवतांपुढे भाविकांनी ठेवलेले पैसे सरकारजमा करू नयेत, तर पुजारी व देवळातील नोकरवर्गास द्यावेत, असेही त्यांनी सुचविले होते. एप्रिल १६९० मध्ये राजारामांनी आपले अष्टप्रधान मंडळ घोषित केले, ते खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. निळोपंत पिंगळे | पेशवा |
| २. शंकराजी नारायण | सचिव |

Scanned with OKEN Scanner